# वस्तुस्थिती स्वीकारू

हवामान व वातावरणाची सध्याची स्थिती खरंच काळजी करण्यासारखी आहे. त्याबाबत आपले काहीही मत असले तरी या परिस्थितीत फारसा बदल होण्याची चिन्हे नाहीत. त्यामुळे खरं सांगायचे तर पुढील काही दशकांमध्ये आपल्याला हवामानबदलाचे चटके सहन करावे लागणार आहेतच. त्याचा काही भागात जास्त त्रास होण्याची शक्यता आहे, तर काही प्रदेशात ते कमी प्रमाणात तसे होण्याची चिन्हे आहेत. पण त्याचा परिणाम हा होणार हे निश्चित. त्यामुळे आपल्याला व पुढील पिढ्यांना या परिस्थितीचा सामना करावाच लागेल. या हवामानबदलांकडे किंवा येऊ घातलेल्या संकटाकडे दुर्लक्ष केले तर ते डोळे झाकून (चोरून) दूध पिणाऱ्या मांजराप्रमाणे होईल. आपण डोळे झाकले म्हणजे आपल्याला चोरून दूध पिताना कोणी पाहत नाही, असे मांजराला वाटते. पण प्रत्यक्षात इतरांना ते दिसतेच. त्याचप्रमाणे माणसाने हवामानबदलांकडे दुर्लक्ष केले तरी हे घडतच राहील व पुढे आपल्यालाच त्याचे गंभीर परिणाम भोगावे लागतील. त्यामुळे त्यावरचा उपाय म्हणजे आहे ती वस्तुस्थिती स्वीकारणे. जे काय घडत आहे ते मान्य केले व त्याचा स्वीकार केला तर त्यातून मार्ग निघण्याची शक्यता वाढते. ही समस्या नेमकी कशामुळे उद्भवली आहे? तिचे स्वरूप काय आहे? हे समजून घेऊन त्यावरील उत्तरे शोधता येतील व त्याप्रमाणे वागतासुद्धा येईल. पण या समस्येकडे दुर्लक्ष केले तर मात्र ही परिस्थिती सुधारण्याचे सर्व मार्ग आपणच बंद केल्यासारखे होईल. त्यामुळे डोळे झाकण्यापेक्षा ते उघडे ठेवून आहे ते मान्य करू आणि त्यातून मार्ग काढण्यासाठी सर्वजण मिळून प्रयत्न करू. असे केले तरच भविष्यात हवामानबदलाची तीव्रता कमी करणे शक्य होईल आणि आपले जगणेसुद्धा सुसह्य होईल.



प्रश्न- हवामानबदलाबाबत वस्तुस्थिती स्वीकारणे का गरजेचे आहे?

(उत्तर- रविवार, २१ डिसेंबरच्या अंकात)



MAHARASHTRA
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ
प्रस्तुत
लोकसत्ता गाथा ज्ञानाची



## करा वृक्षारोपण

**मिळेल प्रदूषणविरहित पर्यावरण!**

प्रत्येक वाहनधारकाने स्वतःच्या परिसरात वृक्षारोपण करून झाडांची निगा राखली तर झाडे शहरातील प्रदूषण रोखण्यास मदत करू शकतात.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ
Website: http://mpcb.mah.nic.in

दर गुरुवारी सकाळी ७.४० वा. आकाशवाणीच्या अस्मिता वाहिनीवर जागर पर्यावरणाचा कार्यक्रम ऐका.